हिंदूसंघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत

# हिंदु जनजागृती समिती

नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

भ्रमणध्वनी क्रमांक

ई-मेल
contact@HinduJagruti.org
संकेतस्थळ
www.HinduJagruti.org

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

।। जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम ।।

दि. 21.6.2016

प्रती,
मा. संपादक / मुख्य वार्ताहर

**कृपया प्रसिद्धीसाठी !**

## गोवा येथील अखिल भारतीय हिंदू अधिवेशन

# बांगलादेशी हिंदूंसाठी बांगलादेशात स्वतंत्र भूमी हवी ! – श्री. सुभाष चक्रवर्ती

**रामनाथी (गोवा)** – पूर्व पाकिस्तानच्या निर्मितीपासून तेथील हिंदूंवर अनन्वित अत्याचार होत आहेत. त्यानंतर वर्ष 1971 मध्ये भारत सरकारने स्वतंत्र बांगलादेश बनवल्यानंतरही हिंदूंवरील अत्याचारांमध्ये वाढच झाली. त्यामुळे कोट्यवधी बांगलादेशी हिंदू भारतात पलायन करत आहेत. अखंड भारताचे अविभाज्य घटक असलेल्या या हिंदूंसाठी भारत सरकारने बांगलादेशात स्वतंत्र भूमी (होमलॅण्ड) निर्माण करावी, अशी मागणी बांगलादेशमधील हिंदूंच्या समस्यांवर आवाज उठवणारे 'निखिल बंग नागरिक संघ' या संघटनेचे सचिव श्री. सुभाष चक्रवर्ती यांनी पंचम अखिल भारतीय हिंदू अधिवेशनस्थळी 21 जून 2016 या दिवशी झालेल्या पत्रकार परिषदेत केली. या वेळी नेपाळमधील 'फोरम ऑफ नेपालीज् मीडिया'चे (नेपाळी प्रसारमाध्यम मंच) अध्यक्ष प्रा. निरंजन ओझा, श्रीलंकेतील श्री. मरवनपुलावू सच्चिदानंदन्, काश्मीर येथील 'युथ फॉर पनून कश्मीर'चे राष्ट्रीय समन्वयक श्री. राहुल कौल आणि सनातन संस्थेचे प्रवक्ता श्री. चेतन राजहंस उपस्थित होते.

श्री. सुभाष चक्रवर्ती पुढे म्हणाले, ''बांगलादेशात हिंदु महिलांची अब्रू लुटणे, जमीन बळकावणे, मंदिर तोडणे, पुजाऱ्यांचे खून करणे आदी अत्याचार बंद होण्यासाठी भारत सरकारने प्रयत्न करून बांगलादेशात हिंदूंना मानाचे आणि सुरक्षित स्थान निर्माण करून द्यावे.'' श्री. राहुल कौल म्हणाले, ''विस्थापित झालेल्या काश्मिरी हिंदूंना मानाने काश्मीरमध्ये वास्तव्य करता यावे, यासाठी केंद्रशासनावर राष्ट्रभरातील हिंदूंनी संघटितपणे दबाव आणणे अपेक्षित आहे. यादृष्टीने काश्मिरी हिंदूंसाठी भारतभरात 19 ठिकाणी अधिवेशने घेण्याचे ठरवले आहे.'' श्री. मरवनपुलावू सच्चिदानंदन् म्हणाले, ''श्रीलंकेतील बौद्ध शासनाकडून तेथील हिंदूंचे दमन केले जात आहे. हिंदूंना मारण्याचा आणि पकडण्याचा अधिकार असलेला तेथील जुलमी कायदा बदलला पाहिजे. यासाठी आम्हाला भारताची मदत अपेक्षित आहे.'' प्रा. निरंजन ओझा म्हणाले, ''नेपाळचे संविधान निधर्मी बनवून नेपाळमधील हिंदूंचे धर्मांतर करण्याचा डाव आहे. वर्ष 2030 पर्यंत नेपाळला ख्रिस्ती राष्ट्र बनवण्याचे षड्यंत्र आहे. नेपाळ हे हिंदु राष्ट्र असणे हे भारताच्या हिताचे असल्याने नेपाळला हिंदु राष्ट्र बनवण्यासाठी भारत शासनाने साहाय्य केले पाहिजे.'' 'पाकिस्तानमधून भारतात आलेल्या हिंदूंना भारतीय नागरिकत्व मिळणे आणि घुसखोरी रोखण्यासाठी बांगलादेशची भारताशी जोडलेली सीमा सीलबंद करण्याची प्रक्रिया होणे, हे मागील राष्ट्रीय हिंदू अधिवेशनांमधून प्रेरणा घेऊन हिंदूंनी केलेल्या प्रयत्नांचे फलित आहे', असे श्री. चेतन राजहंस यांनी या वेळी सांगितले.

आपला विनीत,

रमेश शिंदे

श्री. रमेश शिंदे, राष्ट्रीय प्रवक्ता, हिंदु जनजागृती समिती,
संपर्क क्रमांक : 09987966666